**महाराष्ट्र शासन**

**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४० ०२२

दूरध्वनी क्र.०७१२- २८७०१२०/२१ CIN No. U८५३००PN२०१९NPL१८७४०५ ई-मेल: mahajyotimjprf@gmail.com


जावक क्र. महाज्योती/पीएचडी विभाग/२०२६-२७/1621 दि. 08/07/2026

# परिपत्रक

विषय : महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती योजना २०२३ अंतर्गत विद्यार्थ्यांच्या नोंदणी दिनांकापासून ते दि.२४/०७/२०२४ या कालावधीतील थकबाकी अधिछात्रवृत्तीबाबत सूचना.

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती योजना २०२३ अंतर्गत निवड झालेल्या सर्व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, दि. २४/०४/२०२६ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती योजना २०२३ अंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणी दिनांकापासून दि. २४/०७/२०२४ पर्यंतच्या कालावधीतील थकबाकी अधिछात्रवृत्तीपैकी दि. ०१/०१/२०२४ ते दि. २४/०७/२०२४ या कालावधीतील पहिल्या हप्त्याची अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांना सदर कालावधीतील पहिल्या हप्त्याची थकबाकी अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने नोंदणी दिनांकापासून दि.२४/०७/२०२४ पर्यंतच्या कालावधीतील उर्वरित थकबाकीपैकी दुसऱ्या हप्त्याची (दि.०१/०७/२०२३ ते दि.३१/१२/२०२३ या कालावधीतील) अधिछात्रवृत्ती रक्कम अदा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने सर्व संबंधित विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या आधार क्रमांकाशी संलग्न असलेल्या बँक खात्याची क्रेडिट लिमिट तात्काळ वाढवून घ्यावी.

(मिलिंद नारिंगे)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व
प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर